महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुबई- ४००००१.

दूरध्वनी क्र.०२२-२२०१ ७१०३ E-Mail- est14-rdd@mah.gov.in

---

क्रमांक. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.१७५/आस्था-१४ दिनांक :- ०२ मे, २०२२

प्रति

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**विषय :** आपसी आंतरजिल्हा बदली झाल्यावर बदललेली सेवाज्येष्ठता दिनांक जिल्हांतर्गत शिक्षकांच्या ऑनलाईन बदली प्रक्रिया सन २०२२ मध्ये ग्राह्य धरणेबाबत.

**संदर्भ :** आपले क्रमांक. जिपउ/शिक्षण/आ-८/कावि-६२२/२०२२, दिनांक २.५.२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे.

२. आंतरजिल्हा बदलीने जिल्ह्यात रुजू झालेल्या शिक्षकांनी आपसी आंतरजिल्हा बदलीसंदर्भातील सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार देण्यात येणारी सेवाजेष्ठता ग्राह्य धरुन त्यांचा बदलीकरिता पदावधी गणण्यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.३८८५/२०२२ दाखल केली आहे. तसेच याच विषयाच्या अनुषंगाने अन्य रिट याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका देखील या याचिकेसोबत एकत्रित (Tag) करण्यात आल्या होत्या.

३. आपसी आंतरजिल्हा बदलीने रुजू झालेल्या शिक्षकांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६(८) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीकरिता सेवाजेष्ठता देण्यात आलेली आहे. सदर याचिकेतील याचिकाकर्त्यांना सदरची सेवाजेष्ठता त्यांच्या विद्यमान जिल्हा परिषदेतील पदावधीशी संलंग्नित करुन हवी आहे. यासंदर्भात कोणतीही तरतुद दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयात नमूद केलेली नाही. पदोन्नतीकरिता सेवाजेष्ठता व बदलीकरिता सर्वसाधारण क्षेत्रातील वास्तव्य सेवाजेष्ठता ह्या परस्पर भिन्न बाबी आहेत. दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १.१ नुसार अवघड क्षेत्राची व्याख्या दिलेली आहे. सदर व्याख्येनुसार अवघड क्षेत्र निश्चित करण्यासाठी निकष दिलेले असून त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अवघड क्षेत्र घोषित करावयाचे आहे. सदर अवघड क्षेत्रात न मोडणारी गावे ही सर्वसाधारण क्षेत्रात मोडतील, अशी व्याख्या सर्वसाधारण क्षेत्राकरिता परिच्छेद १.२ मध्ये करण्यात आलेली आहे. सदरची तरतुद पाहता संबंधित सर्वसाधारण क्षेत्र हे त्या-त्या जिल्ह्यातील क्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे आपसी बदलीने आलेल्या शिक्षकांची अन्य जिल्ह्यात केलेली सेवा ही उक्त सर्वसाधारण क्षेत्राच्या व्याख्येत येणार नाही. त्यामुळे आपसी बदलीने आलेल्या शिक्षकांची सर्वसाधारण क्षेत्रातील गणना ही विद्यमान जिल्हा परिषदेत प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासूनच करणे अपेक्षीत आहे. त्यामुळे दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.५.१ मधील जिल्हा परिषदेतील एकूण सेवा हा शब्दप्रयोग विद्यमान जिल्हा परिषदेतील सेवा असा

विचारात घेणे अपेक्षीत आहे. सबब, इतर जिल्ह्यातून आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांची विद्यमान जिल्ह्यातील सर्वसाधारण क्षेत्रात केलेली सेवा १० वर्षापेक्षा जास्त असेल व विद्यमान शाळेत ५ वर्षे सेवा झाली असल्यास त्यांचा समावेश बदलीपात्र यादीत येईल.

४. मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २१.४.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद ५ मध्ये जिल्हांतर्गत बदल्यांसाठी दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार (म्हणजेच परिच्छेद ४.५.१ च्या अनुषंगाने) बदलीची कार्यवाही या मर्यादित उद्देशाकरिता वेगळी जेष्ठतायादी असण्याबाबत वादी व प्रतिवादी यांचे दुमत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २१.४.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद १० मध्ये नमूद केले आहे की, परिच्छेद ७ मधील अन्य जिल्हा परिषदेतील याच स्वरुपाच्या याचिकाकर्त्यांच्या अभिवेदनाबाबत निर्णय घेण्याबाबत दिलेल्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या दिनांक २९.३.२०२२ च्या पत्रातील गुणवत्तेत न जाता ते फेटाळले आहे. त्यामुळे मा.न्यायालयास येथे दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.५.१ च्या अनुषंगाने बदलीपात्र शिक्षकांची यादी प्रसिध्द करणे व त्या आधारे याचिकाकर्त्यास त्याच्या अभिवेदनावर पत्रोत्तर देणे आवश्यक आहे, असे अपेक्षीत आहे.

५. उक्त प्रमाणे परिच्छेद ३ मधील दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णयातील बदलीपात्र शिक्षकांच्या तरतुदीसंदर्भातील विवेचन व परिच्छेद ४ मधील मा.न्यायालयाच्या आदेशाचे अर्थान्वेषण याबाबत आपण आपल्या विधी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार मा.न्यायालयात अर्ज दाखल करावा आणि दिनांक २१.४.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद ८ व १० बाबत मा.उच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण प्राप्त करावे.

( सुनिल हंजे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.